(Marathi)

1039 / 9/21

1573 29 P

1573 121 87 1573 Mar
IMPERIAL RECORD DEPARTMENT RECEIVED. 3 MAR 1931

॥ वंदे मातरम् ॥

# स्वातंत्र्य-रहस्य !

(प्रभातफेरीची उत्तेजक पदें.)



लेखक व प्रकाशक,

**गोविंदकुमार देशपांडे, बेळगांव.**

प्रथमावृत्ति ] किंमत १ आणा. [ प्रति दोन हजार.

1573 Mar

# स्वातंत्र्य-रहस्य !

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1573
Date 17.1.72
GOVT. OF INDIA

## श्रीशारदास्तवन

(चालः–राधे कृष्ण बोल०)

नमन तव पदां, शारदे, काव्य-संपदे, देईं कल्पना मला ॥ ध्रु० ॥ काव्यकलेची तूं राशी । सुरस अशा काव्य जननी । हो प्रसन्न देवि कवनीं । स्फूर्ति तूं मला देईं, प्रार्थितों तुला ॥ १ ॥

---

## झेंडा—वंदन

तुज हिंद-राष्ट्र झेंड्या, नमी ही सेना ॥ ध्रु० ॥ माय भूमिच्या, हिंद जनांच्या स्वाभिमान चिन्हा ॥ १ ॥ फडकुनि येथें रात्रंदिन, करि पारतंत्र्य दैना ॥ २ ॥ स्वराज्य स्थापी हिंददेविचें, पळवुनि सैताना ॥ ३ ॥ रक्षाया तुज सिद्ध लढाया, भीत नसे मरणा ॥४ ॥ नव्या युगाचे सत्याग्रहि हे, लीन तुझ्या चरणां ॥ ५ ॥

---

## सहन किती करणार ?

( चालः–हें ब्युराक्रसी सरकार० )

किति स्वस्थ असे बसणार ? कधीं उठणार ? । हा जाच जुलूमी डोळे झांकुनि, सहन किती करणार ? ॥ ध्रु० ॥ ऐकला जुलुम जो कानीं, पाहिलांत जो डोळ्यांनीं । निशिदिनिं ही बहुधा स्वप्नीं, तो सहन करुनी दीन होउनी व्यर्थचि कां मरणार ? ॥ १ ॥ न्याय हें नांव जुलमास, ही दडपशाहि हो खास, बेबंदशाहिचा कळस,

ही जुलमी सत्ता झुगारण्यास्तव सज्ज कधीं होणार? ॥ २ ॥ ही परमप्रिय भूमाता, पारतंत्र्यि लोळत पडतां, कां स्वस्थ असे हो बसतां? त्या स्वातंत्र्यास्तव तुह्मी अहिंसा-युद्ध कधीं लढणार? ॥ ३ ॥

---

## महात्माजींचा महामंत्र!

### ( चालः-उद्धवा शान्तवन कर जा० )

भारतास उद्धाराया । वापरा स्वदेशी खादी ॥ ध्रु० ॥
हें जाडें भरडें वस्त्र । बहु स्वस्त टिकाऊ पाहीं ॥
अति पातळ कुजक्या तुटक्या । मलमलीसारिखें नाहीं ॥
त्या दुष्ट विदेशीयांना । द्यायचा न पैका कांहीं ॥
मग कशास तसलें घेतां?
कां उगीच तोटा करतां? ।
आपुल्याच स्वार्थाकरितां-
कां तोड नसे एखादी? ॥ १ ॥ वापरा० ॥
कां हो? मँचेस्टर-पट तें । खादीच्या इतकें टिकतें?
झिरझिरीत मलमल ती कां । मज्जाव थंडिला करिते?
डोळे मग फुटले वाटे । कां, कानां ऐकुं न येतें?
अति शुभ्र विमल हें वस्त्र ।
उबदार नसे अन्यत्र ।
जें करी स्वदेश स्वतंत्र ।
घेतलें हवें हो आधीं ॥ २ ॥ वापरा० ॥
जरि केवळ फॅशनसाठीं । ती दिखाउ मलमल घेता ॥
पुरवील हौस ही खादी । कां परक्या पैका देता॥
सोडुनी वस्त्र पिळदार । जाळिदार कां हो घेता॥

बांगड्या न हातीं भरता ।
अबलांवरि ताणहि करता ।
खुपतें कां नाजुक अंगा ?
जडल्या कां तुम्हां व्याधी ? ॥ ३ ॥ वापरा०
आणि बहिष्कार त्या घाला । परदेशीं वस्त्रावरती ॥
जीं द्रव्य हिरावुनि नेतीं । गरिबांना जी मोहविती ॥
त्या ' पिकेटिंग ' करण्यास । सज्ज व्हा दुकानावरतीं ॥
वस्त्रें जीं उरलीं सुरलीं ।
मग करा तयाची होळी ।
परवशा खचित ती जाळी ।
युक्ती ही ऐका साधी ॥ ४ ॥ वापरा० ॥
घेउनिया हातीं चाती । किंवा तो चरखा साधा ॥
कांतुनी सूत निज हातीं । तो स्वर्ग सुतानें साधा ॥
अजि स्वराज्य मिळण्यासाठीं । हा मार्ग एकची साधा ॥
व्हा तयार एका पाया
हातानें वस्त्र विणाया ।
नच आतां गति हो अन्या ।
म्हणतात महात्मा गांधी । वापरा स्वदेशी खादी ॥ ५ ॥


---

## सत्याग्रह !

कोणी न कुणाचे दास । आह्मीच आमुचे खास ॥ धृ० ॥
हा भारत आमुचा देश । कांहींच नसे संदेह ॥
ऐकुं नका पर आदेश । जरि जाईल तुमचा देह ॥
आमुचा क्षीरसागर हा । त्यांचा न कांहिं लवलेह ॥

देवानें आज्ञा दिधला ।
ह्मणुनीच किनारा झाला ।
दिव्यशा मातृभूमीला ।
घ्या स्वराज्य, सोसुनि त्रास ॥ १ ॥ आह्मीच० ॥
खा मीठ भाकर अपुली । परि नका परांकित राहूं ॥
मीठ तें स्वतःचें सेवूं । कधिं दुसऱ्यांना ना सेवूं ॥
मुळिं तयां भ्यायचें नाहीं । हक्कास्तव प्राणहि देऊं ॥
प्रतिकार करूं अधिकारा ।
सहकार नको सरकारा ।
नच त्यांना देऊं सारा ।
थारा नच देऊं त्यांस ॥ २ ॥ आह्मीच० ॥
त्या नोकरशाहीवरती । बहिष्कार आतां घाला ॥
जरि आला कसला घाला । मागुतीं न जा, जरि मेला ॥
परक्यांच्या दास्यांतूनी । सोडवाच भूमातेला ॥
व्हा हिंदु–अहिंदू एक ।
देवाचिं लेंकरें देख ।
जाति द्वेषिं ना मुळिं सौख्य ॥
अजिं करुंया ऐक्याभ्यास ॥ ३ ॥ आह्मीच० ॥
सत्यावरि ठेवुनी भिस्त । करुं असत्यास उध्वस्त ।
काराग्रह जरि ही दिसला । डरतां न, करूं अरि फस्त ॥
सत्याग्रह करुं एकीनें । नमवूं त्या आंग्लां मस्त ॥
हें अमोघ अनुपम शस्त्र ।
नव अजिंक्य भारतिं अस्त्र ।
ना हिंसा, परि अरि त्रस्त ।
सत्याग्रह करित तयार ॥ ४ ॥ आह्मीच० ॥

## सुदर्शन–चक्र !



( चालः–ह्मातरा इतुका न० )

स्वराज्य हा देणार । खरोखर । स्वराज्य हा देणार ॥ धृ० ॥
हेंच ' सुदर्शन–चक्र ! ' आमुचें, स्वराज्य जें देणार ।
सुवर्णभूला स्वतंत्र करण्या, चरखा नव–हत्यार ॥
घरघर करुनी थरथर हलवी मँचेस्टर कोठार ॥
घरबसल्या हा घरोघरीं कीं करितो सुख–संचार ॥
विजयश्री अणि अर्पूनि श्रीला, घालिल तुह्मां हार ॥
करुनि अहिंसा, रणांगणामधिं हार न कधिं जाणार ॥
स्वराज्य द्याया हिंदजनांना, करून राष्ट्रोद्धार ॥
चरखा अमुचा निज कष्टार्जित अन्नवस्त्र देणार ॥
सूत्रधार जे, जगांत ज्यांचा हात न कुणि धरणार ॥
गांधि महात्मा चक्रपाणि ते ह्मणती वारंवारः—
' स्वर्ग सुतानें गाठायास्तव हाच खरा आधार ' ॥
बोला ' हरहर ' चरख्याचा ह्या, करुनी जयजयकार ॥

---

## धर्मयुद्धाला चला !

( चालः–शान्तवा हो मानसा० )

चक्रपाणी भूतलां । गांधिवेषें पातला । हिंदभूला बोलिला । ' सोडवीतों मी तुला ' ॥ धृ ॥ माकडांनीं गोरिला । देश सारा त्रासिला । स्वस्थ कैसे झोंपला । धर्म–युद्धाला चला ॥ १ ॥

---

## चरखा– गीत–रत्न !

### ( चालः–आनंद कंद० )

चरखा चलाचलाके । लेंगे स्वराज्य लेंगे ॥ धृ० ॥ मलमल जो है विदेशी । आनेको गज मिलेगा । खादी नहीं त्यजोंगे ॥लेंगे ॥१॥ बहोत्तर करोड रुपिया। परदेश जा रहा है। उसकू बचाबचाके ॥ लेंगे ॥ २ ॥ चरखेकि घणघणाट । रणभेरियाँ बजेंगे । अंग्रेजको सुनाके । लेंगे ॥ ३ ॥ चरखेसे सूत होगा । विदेशि रो उठेगा ॥ मीलोंको बंद करेंगे । लेंगे ॥४॥ या हक्क है हमारा । तनजानसे भि प्यारा । मरनें नहीं डरेंगे ॥ लेंगे ॥५॥ हम् सब् परेड फौजी । कप्तान् हमारा गांधी । आज्ञा उसीकि लेंगे ॥ लेंगे ॥ ६ ॥ तेहतीस करोड फौजी। रणसाथ ए चलेंगे । गांधी हुकूम करेंगे ॥ लेंगे ॥ ७ ॥ चरखाहि तोफ बनेंगे। तकवा बने है बरची । गोलेसे सूत्रके हम् ॥ लेंगे ॥८॥

## दिसतें तसें नसतें, ह्मणून जग फसतें !

बनिया ह्मणोनि आला । धंदा करावयाला ॥धृ०॥ व्यापार वाढवूनी । लालूच दाखवूनी । त्यानें तुह्मां अह्मांला। नेले रसातळाला. हो । ॥ बनिया० ॥ १ ॥ सशस्त्र दरोडखोर । लोकांवरी निशस्त्र । अवचीत घालि घाला । छळि व्यर्थची प्रजेला हो ॥ २ ॥ जुलुमास नाहिं गणति । नाहींच न्याय–नीति । ह्मणतां दयाळु ज्याला । नाहीं दया तयाला हो ॥३॥ हा हिंद देश अपुला । ब्रिटिशांनि फस्त केला। तरि उठा कशास निजला । जय महात्मा गांधि बोला हो ॥ ४ ॥

—समाप्त.—

त्वरा करा ! ] वंदे मातरम् [ नांवें नोंदवा !!

# अनंत चतुर्दशीच्या सुमुहूर्तावर उघडण्यांत आलेलें विद्यार्थ्यांचें

# हिंदमाता-वाचनालय.

मासिक वर्गणी ४ आणे.

पत्ता:-से. ' हिंदमाता वाचनालय'

समादेवी रोड, बेळगांव.

---

## ' हिंदमातेचा उदय ! ' व 'स्वराज्य संजीवनी' लवकरच प्रसिद्ध होतील.

---

मुद्रक:-हें पुस्तक क. रा. आंबेवाडी यांनीं डी. आर. ठाकूर यांच्याकरितां तरुण भारत प्रेस, बेळगांव येथें छापिलें.